**जिल्हा एकात्मिक आरोग्य व कु.क सोसायटी**
**राष्ट्रीय आरोग्य अभियान, वणी**
**कंत्राटी पद भरती करण्याबाबत**

राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान अंतर्गत विविध कंत्राटी रिक्त पदाची भरती करण्याकरीता इच्छुक उमेदवार कडून अर्ज मागविण्यात येत आहे.सदर अर्ज नमूद केलेल्या ठिकाणी उमेदवारांनी अर्ज सादर करण्यात यावे.

| अ क्र | पदनाम | रिक्त पद संख्या | प्रवर्ग | शैक्षणिक अहर्ता | प्रती महिना मानधन | अर्ज सादर करावयाचा पत्ता |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | Medical Offcer (Full time) M.B.B.S | १ | खुला | MBBS कॉन्सिलचे नोंदणी प्रमाणपत्र आवश्यक राहील | ६०,००० /- | तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय वणी - |

टिप :- १) वरिल दिलेल्या जाहिराती मध्ये वैद्यकिय अधिकारी पूर्ण वेळ (Medical Officer) यांचे अर्ज दिनांक १५/०१/२०२६ पासुन ते दिनांक २३/०१/२०२६ रोजी पर्यंत सायंकाळी ५.४५ वाजेपर्यंत (सुटटीचे दिवस वगळून) तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय वणी येथे अर्ज स्वीकारण्यात येईल. तसेच सदर पदांसाठी अधिसुचनेनूसार तक्ता “अ “ प्रमाणे मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. यवतमाळ यांच्या अध्यक्षतेखाली संबंधीत उमेदवारांची मुलाखत घेण्याबाबत दिनांक संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. त्यानूसार संबधीतांनी उपस्थित राहणे अनिवार्य राहील.

२) वैद्यकिय अधिकारी पूर्णवेळ (**MBBS**) हे पद थेट मुलाखती घेवून भरण्याकरिता खालील तक्ता अ मधील गुणांकन पध्दतीचा अवलंब करण्यात येईल, सदर तारखे मध्ये उमेदवार उपलब्ध न झाल्यास अथवा नव्याने पदे रिक्त झाल्यास सदर रिक्त पदाच्या अनुषंगाने सर्व रिक्त पदे भरे पर्यंत वैद्यकिय अधिकारी एम.बी.बी.एस. यांची मुलाखत महिण्याच्या दुसरा मंगळवार व चौथा मंगळवार रोजी घेण्यात येईल.

*आवश्यक कागदपत्रे:-* खालील कागद पत्राची मुळ प्रतीची छायांकित प्रत स्वसाक्षांकित करुन अर्जासोबत सादर करणे अनिवार्य राहील.

१) अर्ज केलेल्या पदा करीतांची नमुद शैक्षणीक पात्रता बाबत गुणपत्रीका, बोर्ड प्रमाणपत्र, पदवी प्रमाणपत्र.
२) पदवी/पदवीका प्रमाणपत्रे
३) गुणपत्रीका (संपूर्ण वर्षाच्या)
४) शैक्षणीक अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे.
५) संगणक अर्हतेचे प्रमाणपत्र.
६) जातीचे प्रमाणपत्र.
७) शाळा सोडल्याचा दाखला/जन्म तारखेचा दाखला.
८) प्रमाणित केलेले अनुभव प्रमाणपत्र (संबंधित पदाचा अनुभव ग्राह्य धरण्यात येईल.)
९) वैद्यकीय अधिकारी, स्टाफ नर्स, एल.एच. व्ही. फार्मासिस्ट पदाकरिता संबंधीत परिषदेचे वैध नोंदणी प्रमाणपत्र, जोडणे बंधनकारक राहील,
१०) पासपोर्ट आकाराचा फोटो.
११) नॉन क्रिमिलिअर प्रमाणपत्र.

(सदर अर्जा सोबत आवश्यक कागद पत्रे जोडलेली नसल्यास सदर उमेदवाराला कुठल्याही प्रकारचा आक्षेप घेता येणार नाही.)

अटी व शर्ती :-

१) सदर नियुक्ती ही पुर्णतः कंत्राटी स्वरुपाची असुन दिनांक २९ जुन २०२६ पर्यंत राहिल पुढील आर्थिक वर्षात सदर कार्यक्रमाला पदास मंजुरी मिळाल्यास निवड झालेल्या उमेदवारास ११ महिने २९ दिवसाकरिता नेमणूक दिल्या जाईल तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियान अंर्तगत प्रकल्पाला पुढील वर्षा करिता पदास मान्यता मिळाल्यास संबंधित कंत्राटी कर्मचारी यांचे वार्षिक मुल्यांकनाचे आधारे पुढील कालावधीकरिता पुर्ननियुक्ती देण्यात येईल.

२) अर्जदार हा संबंधित पदासाठी शारिरीक व मानसीक दृष्ट्या सक्षम असावा तसेच अर्जदारा विरुध्द कोणताही फौजदारी गुन्हा दाखला झालेला नसावा.